प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

बेस्ट

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,

संपादक / वृत्तसंपादक

प्रसिध्दी पत्रक क्र.०८
दिनांक : २१.०८.२०२५

( सुचेता उतळे )
जनसंपर्क अधिकारी

---

## सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ - गणेश भक्तांकरिता विविध उपक्रम

**मुंबई, २१** - दरवर्षी बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाकडून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मिरवणूक मार्ग, विसर्जन स्थळे या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या कार्यादेशानुसार प्रकाश योजना केली जाते आणि गणेशोत्सव मंडळांना त्यांच्या वीज पुरवठा मागणी अर्जानुसार तात्पुरता वीज पुरवठा केला जातो. बेस्ट उपक्रमाने मुंबई शहरात विद्युत रोषणाईसाठी गणेशोत्सव मंडळांना तात्पुरता वीजपुरवठा मिळण्यासाठी अर्जदारांनी पूर्ण करावयाच्या नियम व अटींच्या सर्व सूचना याबाबत बेस्ट उपक्रमाने प्रसिध्दी पत्रक जारी केलेले आहे.

तसेच गणेश भक्तांसाठीची बस वाहतूक व्यवस्था बेस्टच्या विभागाकडून केली जाते. वर्ष २०२५ साठी बेस्ट उपक्रमाने केलेल्या व्यवस्था याची माहिती खालील प्रमाणे आहे.

बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यादेशानुसार मिरवणुक मार्गावरील व विसर्जनस्थळावरील प्रकाश योजनेची सुरक्षिततेच्या दृष्टिने आखणी केलेली आहे. बेस्ट उपक्रमाने मुंबई शहरात गणेशभक्तांसाठी **७१ मिरवणुक मार्ग, १९ विसर्जन स्थळे आणि ३९ कृत्रिम तलाव येथे २७२३ दिवे** लावण्याची प्रकाश योजना करण्यात येत आहे. विसर्जन स्थळावर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण **१५ स्थायी विद्युत मनोऱ्याची** उभारणी केली आहे. तसेच मोठ्या गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत विद्युतपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विसर्जन स्थळांवर पर्यायी वीज पुरवठ्याकरिता एकूण **८ डिझेल जनित्र संचाची** व्यवस्था करण्यात येणार आहे.

समुद्रात विसर्जन करताना आपत्कालीन प्रसंग उद्‌भवल्यास बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी जीवरक्षक दलास मदत म्हणून समुद्रात खोलवर प्रकाश पोहोचण्यासाठी एकूण **१९ उच्च क्षमतेचे झोत असलेले शोधप्रकाश (सर्चलाईट) दिव्यांची** व्यवस्था करण्यात येणार आहे. विसर्जन स्थळांवरील वीज पुरवठा सुरळीत व अखंडीतपणे चालू ठेवण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येईल.

मुंबई शहर हद्दीत साजरा करण्यात येणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच मुंबईकरांच्या माहितीसाठी बेस्ट उपक्रमाच्या मार्गप्रकाश विभागातर्फे एक माहितीपुस्तिका दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आली.

विद्युत रोषणाईसाठी गणेशोत्सव मंडळांना तात्पुरता वीजपुरवठा मिळण्यासाठी अर्जदारांनी पूर्ण करावयाच्या नियम व अटींच्या सर्व सूचना तसेच बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळांवरील प्रकाश योजनेची माहिती आणि गणेश भक्तांसाठीची बस वाहतूक व्यवस्था यासंदर्भात संपूर्ण माहिती माहितीपुस्तिकेच्याद्वारे प्रदर्शित केलेली आहे. सदर पुस्तिका बेस्ट उपक्रमाच्या वेबसाईटवर ( **www.bestundertaking.com**) देखील उपलब्ध आहे.

═══